Maharashtra Political Science and Public Administration Conference

Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 12 No - 3 Issue - 40 Jan-April 2024 ISSN-2347-9639

IIJIF Impact Factor 2.283

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)



महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे

संपादक

प्राचार्य डॉ. प्रमोद पवार

प्राचार्य डॉ. मनोहर पाटील । प्राचार्य डॉ. बाळ कांबळे । डॉ. लियाकत खान । डॉ. विठ्ठल दहिफळे
प्राचार्य डॉ. विलास आघाव । डॉ. संजय वाघ । डॉ. संभाजी पाटील । डॉ. वकार शेख

१६. महिला आरक्षणाचे राजकारण ........ ८०
– प्रा. डॉ. प्रिया भानुदास बोचे

१७. भ्रष्टाचार अर्थ, व्याख्या, कारणे आणि उपाययोजना ........ ८४
– प्रा. डॉ. आर. डी. शिंदे

१८. लोकशाही व अभिजन सिद्धांत – एक चिंतन ........ ९०
– प्रा. बैनवाड एस. पी.

१९. अध्यक्षीय निवडणूक प्रक्रिया आणि लोकशाही ........ ९३
– डॉ. संतोष नारायण कायंदे

२०. जी २० आणि भारत ........ ९९
– प्रा. गणेश जाधव

२१. भारतीय लोकशाहीमध्ये सोशल मीडियाची भूमिका ........ १०१
– खुपसे गणपती दत्ता

२२. जी–२० आणि भारताची भूमिका : एक दृष्टिक्षेप ........ १०४
– डॉ. सुभाष दौलतराव उपाते

२३. इजराइल फिलिस्तीन समस्या ........ १०९
– प्रा. राजेश शामराव कनिरे प्रा. लोमेश ज्ञा. बावनकुळे

२४. लोकशाही एक बहुआयामी संकल्पना ........ ११३
– डॉ. राजेश्री एन. कडू

२५. इस्राईल – हमास युद्ध आणि त्याचे भारतावरील परिणाम ........ ११७
– प्रा. भोये सुरेश मुरलीधर

२६. भारतीय संविधानांतर्गत संघराज्य : अर्थ आणि वैशिष्ट्ये ........ १२०
– डॉ.अंगद नरसगोंडा पाटील

२७. इजराइल–हमास (पॅलेस्टाईन) : अस्तित्वाचा लढा ........ १२४
– प्रा.अनिल बचाराम मोहिते

२८. लोकशाहीतील प्रसारमाध्यमांची भूमिका ........ १२८
– प्रा. बदनाळे शिवरुद्र शरणप्पा

२९. एक देश,एक निवडणूक ........ १३३
– डॉ. लक्ष्मण एफ. शिराळे

३०. संविधानाने 'चातुर्वर्ण्य' नाकारले, समानती आणली ! ........ १३९
– प्रा. प्रदीप पंजाबराव दंदे

३१. भारत–चीन संबंधातील वर्तमान सीमावादाचे ऐतिहासिक संदर्भातून विश्लेषण ........ १४३
– डॉ. शार्दूल मा. सेलूकर

३२. लोकशाहीतील सर्वात मोठा अडसर... जातिवाद ........ १४८
– डॉ. राजेंद्र श्री. कोरडे

३३. भारतीय लोकशाही : नकारात्मक स्थित्यंतरे ........ १५८
– डॉ. उमाकांत राठोड

# लोकशाहीतील प्रसारमाध्यमांची भूमिका

प्रा. बदनाले शिवरुद्र शरणप्पा
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, जि. लातूर

जगातील सर्वात चांगला शासनव्यवस्थेचा प्रकार कोणता असेल तर तो लोकशाही हा आहे. लोकशाहीस डेमोक्रसी (Democracy) हा इग्रजी पर्यायी शब्द आहे. हा शब्द ग्रीक डेमॉस (लोक) आणि क्रेटस (राज्य) यातून निर्माण झाला आहे. लोकशाहीमध्ये निवडणूक प्रक्रियेला खूप महत्त्व आहे. किंबहुना लोकशाही व निवडणूका अविभाज्य घटकच आहेत. लोकशाहीला प्रेरणा देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करीत असतात. आज प्रसार-प्रचाराचे तंत्र इतके प्रभावी पणे वाढत आहे की, कोणत्याही माहितीचे भांडार म्हणजे प्रसाराची विविध साधने झालेले आहेत. म्हणून कोणत्याही क्षेत्राच्या प्रगतीची असो वा अधोगतीची असो ती माहिती पुरविण्याचे कार्य प्रसारमाध्यमे अखंडपणे करीत असतात. इतकेच काय तर या शासनव्यवस्थेच्या यशापयशाचे मोजमाप करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे प्रसार यंत्रणा होय. अशी प्रसारमाध्यमे लोकशाहीतील निवडणूक प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात.

आज लोकशाही ही केवळ शासनाचा एक प्रकार नसून ती एक जीवनपद्धती (Life live) बनली आहे. जगातील ८० टक्के राष्ट्रांनी या लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला आहे. ग्रीक, इंग्लड, अमेरिका भारतासारखी समृद्ध राष्ट्र याची उदाहरणे होत. लोकशाहीच्या यशाची गुरुकिल्ली म्हणजे निवडणूका (Election) ह्याच होत म्हणजेच लोकशाहीमधून निवडणूका वगळल्यानंतर ती लोकशाही न रहता ठोकशाही होईल लोकशाहीचे अस्तीत्व हे संपूर्ण देशातील निवडणूकांच्या यशस्वीतेवरच अवलंबन असते. लोकशाहीत निवडणूकीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींची निवड केली जाते. निवडून आलेले लोकप्रतिनीधी लोकांच्या समस्या, प्रश्नांचे निरसन करतात तेव्हा लोकप्रतिनिधी कोण असावा? कसा असावा? आणि कसा निर्माण करावा? ह्याचे सर्व प्रशिक्षण जनतेला प्रसारमाध्यमे करत असतात म्हणून प्रसारमाध्यमांना निवडणूकीतील उमेदवाराचे आणि पक्षांचे भविष्य वर्तवणारे ज्योतिष म्हणून ओळखले जाते आहे. प्रसारमाध्यमांनी वर्तवल्याप्रमाणे आज केंद्रात एनडीएने बहुमत प्राप्त केलेले दिसून येते.

**प्रसारमाध्यमाचा अर्थ :** सामान्यपणे प्रसारमाध्यमांचा अर्थ अशा घटकाशी आहे ज्याव्दारे एखादी गोष्ट, सत्यता किंवा माहिती सामान्य नागरीकापर्यंत दृश्य, श्राव्य, मौखिक अथवा लिखीत स्वरुपात पोहचवणे होय.

**निवडणूकीमधील प्रसारमाध्यमांची भूमिका**

**१) लोकजागृती आणि लोकशिक्षण :** वर्तमान काळामध्ये प्रसार माध्यमांचे कार्य अत्याधिक आणि अद्भूत असे आहे त्याची व्याप्ती सतत वाढत चालली आहे इतकेच काप लोकशाही राष्ट्रांमध्ये तर लोकजागृती आणि लोकशिक्षणासाठी एक स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला आहे त्यालाच सूचना विभाग (Information Department) असे म्हणतात. याचा उद्देश जनतेला शासनाद्वारे करण्यात येणाऱ्या कार्याची खरी माहिती देणे आणि विरोधी पक्ष किंवा शत्रुराष्ट्र यांच्याकडून प्रसारीत करण्यात येणाऱ्या माहितीचे खंडण करणे हा आहे. उदा- झूठ और सच, आपकी अदालत या सत्य घटना क्रमावर आधारीत कार्यक्रमाद्वारे प्रसारमाध्यमातून दूध का दूध और पाणी का पाणी करण्याचे कार्य होत असते विशेषतः निवडणूकांच्या काळामध्ये लोकांना मतदारांच्या पात्रतेपासून ते मतदान पत्रिकेच्या आणि मत प्रक्रियेच्या सर्व बाबींची सत्यभूत माहिती लोकांना करुन देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करत असतात लोक शिक्षण व्हावे म्हणून आकाशवाणी, दूरदर्शन, पोस्टर्स बॅनर्स, नाटके, तथा सम्मेलने, व्याख्याने येथील माहिती लोकांपर्यंत पोहचवण्याचे प्रभावी साधन म्हणजे प्रसार माध्यमे होत लोकशाहीत जनता जागृत होऊन, लोकशिक्षण व लोकप्रबोधन यांना गती मिळाली पाहीजे व हे कार्य वर्तमानपत्रे, आकाशवाणी दूरदर्शन, इंटरनेट, मोबाईल इ-प्रसारमाध्यमे निरंतर करीत असतात प्रेरणादायी विचार आणि चळवळ जना जनात ताकदीने आणि प्रभाविपणे पोहचविणा-या माध्यमांची निर्मिती झाली आहे.

**२) मतदारांमध्ये अधिकार आणि कर्तव्याची जाणीव :** लोकशाहीमध्ये लोक हेच राजा आणि आत्मा असतात लोकशाही या शब्दामध्येच त्याचा अर्थ दडलेला आहे लोक म्हणजे जनता, प्रजा तर राज्य म्हणजे सत्ता होय. म्हणजेच लोक + राज्य - लोकांची सत्ता ज्या शासनपद्धतीत लोकांची सत्ता चालते तो शाही म्हणजे लोकशाही होय. अमेरिकेचे माजो अध्यक्ष अब्राहम लिंकन ह्या महापूरूषांच्या मते - 'Democracy is the Government of the people by the people and for the people' (लोकांचे लोकांसाठी लोकांकडून चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.)

एकंदरीत लोक या शब्दाचा अर्थ लोकशाहीमध्ये मतदार असाच घेतला जातो, मतदार हाच आपल्या मतदानाद्वारे देशामध्ये प्रबोधन घडवून आणण्याची ताकद ठेवत असतात अशा ताकदीला समर्पक बळकटी देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करीत असतात निर्वाचन आयोगाने घालून दिलेल्या मतदारांची पात्रता, वय, लिंग, ठिकाण इत्यादी माहितो देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करीत असतात. प्रत्येक भारतीय नागरीकाला मतदानाचा अधिकार आहे. मतदान करणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे इतपर्यंत लोकजागृती घडवून आणण्याचे कार्य प्रसारमाध्यमाद्वारे होते.

प्रत्येक मतदाराला मत पत्रिकेची ओळख करून देण्यासाठी व मतदान पेटीत अथवा बटण दाबण्यापर्यंतची माहिती मीडिया देत असतो. त्याच बरोबर त्यांच्या अधिकार आणि कर्तव्याची जाणीव करून देत असतात.

डॉ. आंबेडकर म्हणतात देशात रक्ताचा एकही थेंब न सांडू देता परिर्वतन घडवून आणण्याची प्रक्रिया म्हणजे निवडणूक पद्धती होय, या निवडणूकीद्वारे मतदार मतदान ह्या शस्त्राचा वापर करून परिर्वतन घडवून आणतात या मतदाराला मतदान कसे करावे? कोणाला करावे? या विषयाची माहिती प्रसारमाध्यमे विविध उपक्रमातून देत असतात.

**३) प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षाची ओळख :** लोकशाही शासनाची यशस्वीता ही निवडणूका आणि राजकीय पक्ष यावर ठरत असते. लोकशाही ह्या रथाची दोन चाके म्हणजे एक राजकीय पक्ष व दूसरे निवडणूका होय निवडणूका ह्या पक्षांच्याद्वारा लढविल्या जातात निवडणूका जर नसतील तर लोकशाही नसेल आणि राजकीय पक्ष नसतील तर खऱ्या निवडणूकाची प्रक्रिया क्लिस्ट दायक ठरू शकते.

प्रसारमाध्यमाद्वारे निवडणूक काळामागे कोणकोणत्या राजकीय पक्षाची निर्मिती करण्यात आली व कोणकोणते प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आले? त्यांचा नेता कोण? त्यांचे निवडणूक चिन्ह कोणते? त्याचा वारस कोण? भावी उमेदवार कोण? इत्यादी माहिती प्रसारमाध्यमे जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य करतात. म्हणजेच एखाद्या पक्षाच्या जन्मापासून ते अस्तित्वापर्यंतचा इतिहास प्रसार माध्यमातून प्रसारित केले जात असते यातून जनता शासनाविषयी जागरुक होते.

विशेषतः कोणत्या पक्षाचे प्रादेशिक अस्तित्व प्राप्त केले आहे. याची माहिती ते देतात. कोणता पक्ष जातीवादी आहे? कोणता पक्ष जिंकून येवू शकतो इतपर्यंत अनुमान लावण्याचे कार्य करुन जनतेला जागरुक करतात.

**४) उमेदवार कोण? व कसा? याचा शोध :** निवडणूकीच्या काळामध्ये प्रसारमाध्यमाना अत्यंत महत्वाचे स्थान देण्यात येते. अनेक प्रसारमाध्यमे आपआपल्या परिने निवडणूक विषयांचे अनुमान वर्तवण्यात प्राविण्य मिळवण्याची एक प्रकारे त्यांच्यात स्पर्धा लागलेली असते. उदा. आजतक, एनडीटीव्ही, झी न्यूज, इंडिया टी. व्ही., एबीपी न्यूज, आयबीएन लोकमत इत्यादी मधील वार्ताहर, पत्रकार, ज्योतीष विद्या, तज्ञव्यक्ति इत्यादीद्वारे उमेदवार कोण आणि कसा आहे? याची रितसर माहिती प्रसारित करतात. एखाद्या वार्डातील किंवा विभागातील उमेदवार हा आमदार किंवा खासदारकीला उमेदवार अर्ज दाखल केल्यानंतर संपूर्ण जन्मकुंडलीच प्रसारमाध्यमाद्वारे प्रसारित होते.

उमेदवाराचे नाव काय
त्याचे जन्मस्थळ कोणते
त्याची बलस्थाने कोणती
त्याची कमकुवतता कोणती
त्याची जात आणि धर्म कोणता?
त्याचे शिक्षण किती
तो व्यवसायाने काय करत होता
त्याचे कुटुंब कसे आहे
त्याचे पूर्व चरित्र कसे होते
त्याने कोणते महत्वाचे कार्य केलेले आहे
त्याला किती मते पड़तील

इत्यादी पर्यंतचे अनुमान निवडणूकपूर्व लावण्याची आणि जनतेला त्याची ओळख करुन देण्याची प्रक्रिया प्रसारमाध्यमे करीत असतात. एकंदर उमेदवाराची इच्छा, आशा, आकांक्षा काय आहेत? याचीही माहिती देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करीत असतात त्यामूळे या प्रसारमाध्यमाचा निवडणूकीवर व मतदानावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाही.

**५) विकास कार्याचा लेखाजाखा :** एखादा उमेदवार कोण आहे इतकेच सांगून प्रसारमाध्यमे थांबत नाही. तर त्या उमेदवाराने पूर्वी विकास कामे किती प्रमाणात केली आहेत याचीही ओळख जनतेला करुन देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करत असतात. अगदी उमेदवारावरुन अनेक निवडणूका या यशस्वी झालेल्या आहेत. उदा. मोदीमुळे गुजरातमधील निवडणूकीत मागिल विस वर्षापासून भारतीय

जनता पक्षाला विक्रमी बहुमत प्राप्त झालेले दिसून येते. विक्रमी बहुमत हे विकासाचे गमक आहे. उमेदवार कोण? कसा? याद्वारे विकासाची, कार्याची तुलना होत असते. उदा. इंदिरा गांधीच्या बाबतीत प्रसारमाध्यमे घोषणा करतात की,

भारत इंदिरा आहे
इंदिरा भारत आहे

म्हणजेच इंदिराजी याच भारत आहेत आणि भारत हा इंदिराजी आहेत. इथंपर्यंत व्यक्तिरेखा रेखाटण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करतात, या प्रसारामुळे अनेक मतदार प्रसारमाध्यमाच्या संभ्रमात अडकून मतदान करत असतात.

**६) पोल खोल प्रसारमाध्यमे :** अनेक प्रसारमाध्यमाद्वारे विकासाचीच नोद होते असे नाही तर निवडणूकीच्या काळात कोणता उमेदवार कसा आहे? तो गुन्हेगार आहे का? त्याचे पूर्व जीवन कसे होते. तो कशाच्या आधारे निवडणूक लढवत आहे. तो उमेदवार निवडून येईल का? तो निवडणूक अचारसंहितेचा भंग करतो का? निवडणूकीची पात्रता त्याच्या अंगी आहे का? तो निवडणूकीच्या काळात किती पैसा, बाटल्या, भेटवस्तू, देणग्या देतो या विषयाची संपूर्ण माहिती देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे निवडणूक काळात करत असतात. बऱ्याच वेळेस तर या माहितीच्या आधारेच मतदान प्रक्रिया होत असल्याने दिसून येते उदा. लोकसभेच्या १६ व्या निवडणूकीत कोळसा घोटाळा, टूजी स्प्रेक्टम घोटाळख, आदर्श घोटाव्य, कॉमनवेल्थ घोटाळा इत्यादी विषयी पोलखोल झाल्यानंतर अनेकांची उमेदवारी कमी झालेली तर अनेकांना राजीनामा द्यावा लागलेला दिसून येतो.

**७) प्रतिनिधी कोण? कोठे? कसा राहतो? :** २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते वर्तमान काळात प्रसारमाध्यमे झपाट्याने वाढत आहेत. याचबरोबर निवडणूकीच्या माध्यमातून लोकशाहीला बळकटी देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करीत आहेत. प्रसारमाध्यमातून मतदारांना उमेदवार कोण? कोठे राहतो? कसा राहतो? याची माहिती मिळते. प्रसिद्ध राजकीय विचारवंत, कौटिल्य म्हणतो की, शासन म्हणजे कोणाला? केव्हा? कसे आणि काय? मिळते या विषयीची माहिती वजा शास्त्र म्हणजे शासन होय. अशा शासनात राजकीय पुढाऱ्यांची ओळख करुन देण्याचे कार्य प्रसार माध्यमे करीत असतात. अनेक प्रसारमाध्यमे खालील ओळीप्रमाणे कार्य करतात.

जे जे आपणासी ठावे । ते ते इंतराशी सांगावे ।
शहाणे करुनी सोडावे । सकळजना ।।
दासबोध समर्थ रामदास

याप्रमाणे प्रसारमाध्यमे सर्व जनतेस शहाणे बनवण्याचे कार्य करतात.

**८) निवडणूक आचारसंहिता आणि प्रसारमाध्यमे :** संपूर्ण देशामध्ये निवडणूक कार्यक्रम घोषीत होण्याबरोबरच निर्वाचन आयोगाकडून निवडणूक विषयीची आचारसंहिता घोषीत होत असते. हो आचारसंहिता मतदार, उमेदवार, लोकप्रतिनिधी, अधिकारी इत्यादीसाठी लागू पडणाऱ्या असतात. या आचारसंहितेची माहिती प्रसारित करण्याचे कार्य तसेच आचारसंहितेची पालन होते की नाही हे पाहण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करीत असतात. अनेक उमेदवार पेसा, प्रतिष्ठा, दबाव, आश्वासने, जात-पात, धर्म या सर्व मार्गाचा निवडणूकीत राजरोजसपणे वापर करत असतात तेव्हा या विषयी जागरुकता निर्माण करण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करतात. निवडणूका खुल्या व भ्रष्टाचारमुक्त असाव्यात निवडणूकी दरम्यान पैसा, ताकत, सरकारी यंत्रणेचा गैरवापर धार्मिक भावना भडकावण्यासाठीचे आवाहणाचा उपयोग निवडणूकी प्रचारात होवू नये व गुन्हेगार निवडून येवू नये म्हणून निवडणूक आचारसंहिता निर्माण करण्यात येते. अशा आचारसंहितेचा भंग करणाऱ्या उमेदवाराचे नाव प्रसिद्ध करण्याचे कार्य निवडणूक काळात प्रसारमाध्यमे करत

असतात. उदा. २०१४ च्या निवडणूकीत अमित शाह या भाजप नेत्याने तसेच आजमखॉन या समाजवादी पक्षाच्या नेत्यानी धार्मिक भावना भडकावण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यामुळे आचारसंहिता भंग केल्याच्या कारणवरुन त्यांच्यावर निवडणूकीच्या काळात संपूर्णपणे भाषणबंदी करण्यात आलेली होती.

**९) एक व्यापक राष्ट्रीय आचारसंहिता :** राष्ट्रहीत हे सर्वात महत्वाचे असते. त्याचा विसर उमेदवाराला पडू नये पक्ष, धर्म, जात, प्रदेश हे नंतर येतात म्हणून अनेक उमेदवारामध्ये व्यापक प्रमाणात राष्ट्रहित असणे आवश्यक असते. त्याचीही आचारसंहिता पाळण्याचे प्रत्येकाचे कर्तव्य असते. माझी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु म्हणतात, 'देश बुडाला तर सगळेच बुडतोल, देश तरला तर सगळेच तरतील. म्हणजेच प्रत्येकाला राज्यघटना देशभक्ती असणे आवश्यक असते अशी देशभक्ती नसणा-या लोकप्रतिनिधींची पोलखोल या प्रसार माध्यमाद्वारे होत असते. देशाच्या अखंडतेला धोका निर्माण करणाऱ्या लोकप्रतिनिधीची ओळख करुन देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करतात.

**१०) निवडणूकीचा पूर्व अनुमान बांधणे :** आजच्या माहितीच्या युगात प्रसारमाध्यमाच्या माहितीने संपूर्ण जग अगदी जवळ केले आहे. कोणत्याही देशाच्या निवडणूका या प्रसारमाध्यमाच्या दूत कार्यामूळे निकाल घोषीत होण्यापूर्वीच त्या पक्षाचे व उमेदवाराचे भविष्य वर्तविण्यात तरबेज झाल्याचे दिसून येतात. प्रसारमाध्यमाच्या प्रभावी साधन सामुग्री आणि जबरदस्त जन संपर्कामुळे कोणतीही माहिती त्यांच्यापासून लपून राहत नाही, प्रत्येक बाजूनी गणिते, अनमाने, पडताळणी, संख्यांची आकडेमोड, आराखडा, गणितीय निष्कर्ष इत्यादी आधार घेवून त्या त्या मतदार संघातील उमेदवारांचे, पक्षाचे भविष्य वर्तवण्यात प्रसारमाध्यमे तरबेज होत आहेत म्हणून निवडणूक पूर्व माहितीमळे सुद्धा अनेक फेरबदल होवून एक गठ्ठा मत बदल्याची ताकत ही या प्रसार माध्यमात निर्माण झालेली दिसून येते.

**११) निपःक्ष व निस्वार्थ अनमान मांडणे :** भारतातील बहुतांश प्रसारमाध्यमे ही निपःक्ष निस्वार्थीपणे आपले अनुमान जनतेसमोर ठेवत असतात पैसा, प्रतिष्ठा, दबाव, जात, धर्म न मानता कोणतीही घटना घडल्यानंतर निवडणूकीच्या पूर्वी जनतेसमोर सादर करतात. खऱ्या अर्थाने प्रत्येक प्रसारमाध्यमे धर्म निरपक्षतेने जातो निरपेक्षतेने कार्य करुन घडलेली सत्य माहिती देत असतात. त्यांच्या निपःक्ष कार्यामूळे अनेक मतदार मतदान करण्यापूर्वी प्रसारमाध्यमांनी पोल खोल केल्याप्रमाणे उमेदवार तपासून योग्य उमेदवारास ते मतदान करतात.

**१२) उमेदवाराचे यश अपयशाचे कारण शोधणे :** कोणता उमेदवा, निवडणूकीमध्ये विजयी झाला आणि कोणता उमेदवार पराभूत झाला म्हणजे कोणत्या उमेदवारास जनतेने मत दिले नाही. तर मतदान का दिले नाही याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रसारमाध्यमे करत असतात. एकंदर उमेदवाराच्या निवडणूकीतील यश अपयशाची गणिते प्रसारमाध्यमे मांडत असतात.

**निवडणूकाद्वारे प्रसारमाध्यमावर पडलेल्या मर्यादा :** लोकशाहीची यशस्वीता ही निवडणूकीवर तर निवडणूकीची यशस्वीता ही प्रसारमाध्यमावर अवलंबून असते. निवडणूकामुळे लोकशाहीला चालना मिळते तर प्रसारमाध्यमामुळे लोकशाहीला बळकटी प्राप्त होते. हे खरे असले तरी आजच्या धावत्या युगामध्ये निवडणूकीद्वारे प्रसारमाध्यमावर अनेक मर्यादा पडलेल्या आहेत. जसे एखादी गोष्ट चकीची असली तरी तीच गोष्ट खरी आहे. असे परत परत सांगितल्यास ती खरी ठरत असते. अशा खऱ्या खोटयाच्या जमान्यात सत्य माहिती बाजूला पडून अतिरेकीपणा येत नाही पण एक कवि म्हणतो त्याप्रमाणे 'खऱ्या खोट्याच्या जमान्यात दुनिया अशी झुलते, अन एतखाऊ मांजर लोण्यावर ठपते.'

**समारोप**

प्रसारमाध्यमांना जनतेचा आवाज म्हणून ओळखले जाते मात्र आजच्या परिस्थितीत प्रसारमाध्यमे समाजाच्या एका विशिष्ट वर्ग आणि क्षेत्राची म्हणजे शहरी भागातील जनतेचा आवाज बनलेले दिसून येतात. याचा परिणाम असा झालेला आहे की, प्रसारमाध्यमे समाज आणि देशातील परिस्थितीला समजून घेण्यात अपयशी ठरलेले आहेत. याचे सगळ्यात मोठे उदा. २००४ व २००९ मधील निवडणूक होते. पण मागिल काही वर्षातील राजकारणातील प्रसारमाध्यमांची भूमिका महत्वाची ठरत आहे. या प्रसारमाध्यमांमुळे आदर्श घोटाळ्याप्रकरणी अशोक चव्हाणांना राजीनामा द्यावा लागला तर एका केंद्रीय मंत्र्यालाही आपले पद सोडावे लागले. अनेक राजकीय व्यक्तीच्या घरावर छापे मारण्यात आले. मात्र २०१९

च्या सार्वजनिक निवडणूकात मीडीयाचा राजकारणातील हस्तक्षेप पाहता ती किंगमेकरची ठरु शकते. कारण आज कोणालाही आपल्या कामाच्या बळावर निवडून येण्यासाठी कामाची नाही, तर मीडीयात मिळणाऱ्या प्रसिद्धीवर अवलंबून रहावे लागत आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री बनलेले केजरीवाल हे याचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येते. तसेच २०१४ च्या सार्वजीक निवडणूकीत भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी निवडून येतील असे वातावरण मिडीयाने निर्माण केले होते व त्या प्रमाणेच आज मोदी पंतप्रधान बनलेले दिसून येत आहेत. यावरूनच निवडणूकीतील प्रसारमाध्यमांची भूमिका किती महत्वाची आहे, हे दिसून येते. यामुळे मीडीयाच्या पाठींब्याशिवाय भविष्यात कोणताही पक्ष राजकारणात यश मिळवू शकणार नाही असा निष्कर्ष काढता येईल.